# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**प्रेस नोट**

दिनांक 11/08/2021 (बुधवार)

(दुपार)

---

स्थानिक गुन्हे शाखा नाग्रा पथकाडून खुन करणाऱ्या आरोपीस 06 तासात अटक

दिनांक 11/08/2021 रोजी सकाळी पो.स्टे.नरखेड शिवारात नरखेड मोवाड रोडवर एका अनोळखी पुरूषाचे प्रेत मिळाल्याची व त्याची कोणीतरी अज्ञात इसमांनी गळा कापुन हत्या केल्याची माहीती प्राप्त झाल्याने स्थानिक गुन्हे शाखा पोलीस निरीक्षक श्री. अनिल जिट्टावार सोबत स्टाफ पोलीस स्टेशन नरखेड तसेच घटनास्थळी भेट देवून मृतका बाबत माहीती काढली असता, सदर मृतक याचा नाव शहजाद लईक शेख वय 30 वर्ष, रा. नरखेड असे निष्पन्न झाले. त्यावरून मृतक याचा खुना बाबत मिळालेल्या गुप्त माहीतीच्या आधारे वरूड येथे राहणारे संशयीत इसम नामे 1) अनवर शेख वल्द शेख गफूर वय 20 वर्ष, रा. मिर्ची प्लॉट वार्डनं. 1 वरूड जि. अमरावती यास ताब्यात घेवुन गुन्हया संबधाने विचारपुस केली असता त्यांने त्याचा साथीदार नामे राजेश सुरेश धुर्वे वय 21 वर्ष, रा. ताज नगर डेपोच्या मागे वरूड जि. अमरावती याचे सोबत मिळून मयत कडून घेतलेल्या व्याजाचे पैश्या वरुन व तिचा आईला दिलेल्या अपमानास्पद अश्लिल शिवीगाळ केल्याची कारणावरून खुन केल्याचे कबुली दिली.त्यांना पुढील कार्यवाही करीता पोलीस स्टेशन नरखेड यांचे ताब्यात देण्यात आले.

सदरची कार्यवाही नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. राकेश ओला, अपर पोलीस अधीक्षक श्री.राहुल माकणीकर, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अनिल जिट्टावार, सपोनि अनिल राऊत, पोउपनि जावेद शेख, सफौ जयप्रकाश शर्मा, पोहवा राजेन्द्र सनोडीया, दुर्गाप्रसाद पारडे, विनोद काळे, पोना शैलेष यादव, पोशि प्रणय बनाफर, अजीज शेख, चासफौ साहेबराव बाहाळे, चापोशि आशुतोष लांजेवार यांनी पार पाडली.



पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर